# तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय उरण
## मोबाईल मेडिकल युनिट उरण
## पदभरती जाहिरात दि. १६/१०/२०२५

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत उरण येथील मोबाईल मेडिकल युनिटसाठी निव्वळ रोजंदारी पदधतीने सन २०२५ - २०२६ या वर्षासाठी दिनांक २९/०६/२०२६ रोजी पर्यतच्या कालावधीसाठी खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून पात्र उमेदवारांकडून दि १७/१०/२०२५ ते दि ३१/१०/२०२५ पर्यतच्या कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती स्तर | मानधन प्रति महिना | एकुण पदे | अनुभव | आरक्षणानुसार जात प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | Medical officer **(female)** | MBBS / BAMS with Valid MMC Registration | Taluka Health office Uran | MBBS साठी रु ६०००० / प्रति माह रोजंदारी तत्वावर<br>BAMS साठी रु ४०००० / प्रति माह रोजंदारी तत्वावर | १ | अनुभवास प्राधान्य | लागू नाही |
| 2 | Lab Technician | Bsc/12 th + DMLT+ महाराष्ट्र परावैदयक परिषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य | Taluka Health office Uran | रु १८०००/ प्रति माह रोजंदारी तत्वावर | १ | १ वर्ष | लागू नाही |

**अटी व शर्ती :-**

१. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच

For contact

① डॉ. अपर्णा खेडकर, तालुका आरोग्य अधिकारी, उरण, मो: नंबर. [redacted]

9545071327, 9004756321

Scanned with OKEN Scanner

अर्जदाराला शासकीय सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

२. राष्ट्रीय आरोग्य अभियान मधुन कोणत्याही संस्थास्तरावरुन एखादया कर्मचा-यांच्या अकार्यक्षमता / अनियमितेच्या कारणामुळे सेवा समाप्त करण्यात आल्या असतील तर त्या कर्मचाा-यास या पुढे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कोणत्याही पदाकरिता विचार केला जाणार नाही.

३. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच शासकीय कर्मचारी यांच्यावर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

४. उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरिता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील तसेच कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तसेच अवैध प्रमाणपत्र उमेदवारांना भरतीप्रक्रियेतुन अपात्र ठरविले जाईल.

५. निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.

६. सविस्तर जाहिरात पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड / प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबतची सर्व माहिती / सुचना http://www.zpraigad.gov.in या संकेतस्थळावर किंवा या कार्यालयाच्या भिंतीफलकावर प्रदर्शित प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. मुलाखतीच्या दिवशी तसेच मुलाखतीअंती निवड झालेस नियुक्ती आदेश देण्यापुर्वी उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची मूळ कागदपत्र निवड समिती मार्फत पडताळणी करण्यात येईल. सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७. शासकीय, निमशासकीय, खाजगी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या संबंधित अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. ज्या पदाकरिता अर्ज केला आहे त्याच पदाचा असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

८. वरिल पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधन रोजंदारी तत्वानुसार भरण्यात येणार असुन सदरील नियुक्ती आदेश हे निर्गमित केलेल्या तारखेपासुन / रुजु दिनांक ते दिनांक २९/०६/२०२६

Scanned with OKEN Scanner

पर्यंतच्या कालावधीकरिता भरण्यात येणार आहेत. पुढील पुनर्नियुक्ती उमेदवाराच्या कामगिरी मुल्यांकनावर आधरित असेल.

९. अर्जदाराला सोयीनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१०. निवड यादीतील गुणानुक्रमानुसार प्राधान्यक्रमाने पदस्थापना केली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांस पुढील सर्व भरती प्रक्रियेतून कायमचे बाद ठरविण्यात येईल.

११. सदर जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

१२. केंद्र शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१३. अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहतील याची दक्षता घ्यावी.

१४. ज्या उमेदवाराना ग्रेड सिस्टीम / CGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापीठानुसार टक्केवारी काढण्याचे सूत्र अर्जामध्ये नमुद करावे. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१५. दि.२३/०७/२०२० च्या पत्रानुसार दोन पेक्षा अधिक हयात मुले असणा-या उमेदवारांचे अर्ज पात्र केले जाणार नाही. सोबत जोडण्यात आलेला **लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना** भरुन अर्जासोबत जोडणे बंधनकराक राहील.

१६. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा त्याची नियुक्ती आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल, **याशिवाय निवड झालेनंतर संबधित पदावर हजर होताना उमेदवाराने कोणत्याही राजपत्रित अधिका-याकडील चांगल्या वर्तणुकीबाबतचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.**

१७. भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग व मा.अध्यक्ष तथा तालुका आरोग्य अधिकारी, तालुका उरण यांनी राखुन ठेवले आहेत. याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

१८. नियुक्ती आदेश स्वीकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्राच्या मुळप्रती पडताळणी करिता सादर करणे बंधनकारक राहील. मुळप्रती सादर न केल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. याची नोंद घ्यावी.

१९. मुलाखतींच्या दिवशी पात्र उमेदवारांनी दिलेल्या मुलाखतीमधील निवड समितीने दिलेल्या गुणांनुसार मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल व तद्नंतर त्यानुसार पात्र उमेदवारांची मेरीट लिस्ट तयार करुन या कार्यालयाच्या भिंतीफलकावर प्रसिध्द करण्यात येईल अथवा शक्य असल्यास मुलाखतींच्या दिवशी पात्र उमेदवारांची मुलाखतीमध्ये प्राप्त गुणांनुसार गुणवत्ता यादी तयार करुन अंतिम निवड यादी त्यांचे समक्ष प्रसिध्द करुन निवड झालेल्या उमेदवारांना अटी व शर्तीनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२०. सदर भरती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर प्रतिक्षा यादी ही संबंधित यादी प्रसिध्द केल्याच्या तारखेपासुन ०१ वर्षा पर्यंत वैध राहील.

२१. जाहिरातीमध्ये दर्शविल्याप्रमाणे नमुद पदाचे मानधन हे रोजंदारी तत्वावर मानधन आहे. याशिवाय इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही याची नोंद घ्यावी.

२२. वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षांपर्यंत शिथिल राहील, एम.बी.बी.एस. यांची कमाल वयोमर्यादा ७० वर्षे राहिल.

२३. विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज, मजकुर अपुर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज, स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले अर्ज, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अपूर्ण भरलेले व न जोडलेले अर्ज इत्यादी प्रकारे सादर केलेल्या अर्जदारांना अपात्र ठरविण्यात येईल याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

२४. उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

- विहीत नमुन्यातील अर्ज (सदर अर्जाचा नमुना जाहिराती सोबत संकेत स्थळावर उपलब्ध असेल)
- शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (१० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर या शैक्षणिक अर्हतेच्या सर्व वर्षे व सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)
- शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला

Scanned with OKEN Scanner

➢ NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला तसेच COVID अंतर्गत शासकिय आरोग्य संस्थेतील विहित पदासाठी काम केलेल्या अनुभवाचा दाखला असल्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच विनावेतन, अर्धवेळ, प्रशिक्षण कालावधी, ॲड-हॉक (Ad-hoc), आंतरवासिता (Internship) चा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

➢ जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र

➢ संबंधित पदाकरिता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट), नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड

➢ पासपोर्ट आकाराचे २ फोटो

➢ उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र

➢ आधारकार्ड

➢ पॅनकार्ड

➢ लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

➢ कागदपत्रांची चेकलिस्ट

२५. सेवानिवृत्त शासकिय अधिकारी / कर्मचारी यांना मुळ वेतन (Basic Pay) + ग्रेड पे या दोन्ही रक्कमेची बेरीज वजा निवृत्ती वेतन यामधील फरकाची रक्कम मानधन म्हणून अनुज्ञेय राहील.

२६. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सेवानिवृत्त (कंत्राटी) अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मानधन निश्चित करताना फरकाची रक्कम व प्रकल्प अंमलबजावणी आराखडयातील पदनिहाय मंजूर मानधनाची रक्कम किंवा पदाचे सदयस्थितीतील अनुज्ञेय मानधन यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहील.

२७.सदर पदभरतीमध्ये महिला वैदयकीय अधिकारी उमेदवार उपलब्ध झाले नाही तर पुरुष उमेदवारांना वैदयकीय अधिकारी पदाकरिता विचार करण्यात येईल.

| | |
|---|---|
| उमेदवाराने मुलाखतीच्या दिवशी अर्ज सादर करावयाचा व मुलाखतीसाठी उपस्थित राहणेचा पत्ता | **तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय उरण, पशु वैदयकीय दवाखाना इमारत चारफाटा ,ता उरण, २ रा मजला** |

दिनांक :- 16/10/२०२५
ठिकाण :- उरण

अध्यक्ष,
निवड समिती
तथा,
तालुका आरोग्य अधिकारी
ता उरण

Scanned with OKEN Scanner

# -:अर्जासोबत जोडावयाची चेकलिस्ट:-

| अ. क्र. | कागदपत्रांचा तपशिल | उमेदवाराने संबंधित कागदपत्र जोडले आहे / नाही | कार्यालयीन कामकाजासाठी |
|---|---|---|---|
| १. | विहीत नमुन्यातील अर्ज | | |
| २. | शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (१० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर या शैक्षणिक अर्हतेच्या सर्व वर्षे व सर्व सत्रांच्या गुणपत्रिका) तपशिल नमुद करावा. | | |
| ३. | शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला | | |
| ४. | NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला तसेच COVID अंतर्गत शासकिय आरोग्य संस्थेतील विहित पदासाठी काम केलेल्या अनुभवाचा दाखला असल्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच विनावेतन, अर्धवेळ, प्रशिक्षण कालावधी, अॅड-हॉक (Ad-hoc), आंतरवासिता (Internship) चा अनुभव | | |
| ५. | जातीचे प्रमाणपत्र | | |
| ६. | जात वैधता प्रमाणपत्र | | |
| ७. | संबंधित पदाकरिता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट), नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड | | |
| ८. | पासपोर्ट आकाराचे २ फोटो | | |
| ९. | उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र | | |
| १०. | आधारकार्ड | | |
| ११. | पॅनकार्ड | | |
| १२. | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | | |

Scanned with OKEN Scanner

# National Health Mission

## District Health Society Raigad

## APPLICATION FORM

Photo

*(All fields in the forms are mandatory to be filled. An incomplete form submitted will be treated as rejected.)*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Exact Name of Position applied for: | | | | |
| Name: | | | | |
| Father's / Husband's Name: | | | | |
| Date of Birth (DD/MM/YYYY): | | Blood Group: | Gender: | |
| Marital Status: | Existing NHM (Yes/No) | Nationality: | Religion: Category: | Applying for which category |

Address / Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)

| | |
|---|---|
| Address (Present):<br><br>State:<br>Pin:<br>Contact No: | Address (Permanent): (Write Same if same as Present Address)<br><br>State:<br>Pin:<br>Contact No: |
| E-mail Id for Correspondence: | Alternate E-mail Id for Correspondence (If any): |

| Languages Known: (Write "Y" / "N") | English | Hindi | Marathi | Others (Please Specify below) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

Academic / Professional Education Summary: (Starting from most recent)

| |
|---|
| Computer Proficiency: |
| Typing Marathi 30 -words per minute : |
| Typing English 40 words per minute : |

| From (DD/MM/YY) | To (DD/MM/YY) | Degree / Diploma / Certificate Course | Full time/Part time | University/ Institute | Specialization / Subjects | Final Year total Marks | Final Year Obtained Marks | Percentage % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

Scanned with ACE Scanner

Scanned with OKEN Scanner

Work / Experience Summary: (Starting from current / most recent)

| Sr. No. | From (DD/MM/YY) | To (DD/(MM/YY) | Organization | Type of organization (Govt. /Semi Govt. Private/Ngo) | Designation | Responsibilities (Min. 30 and Max. 50 Words) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| Total Experience (In Years & Months): | | Relevant Experience to the post applied (In Years & Months): |
| | | Notice Period/Joining Time (Days): |

Details of Internship / Workshops/Conferences/Trainings Attended (If any):

**Declaration:**
I hereby declare that all statements made in the application are true, complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do not satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

Name:

Place:

Date:

Signature

Disclaimer:

The applicants are required to submit the duly filled application on or before the due date and time, failing which the application of the said applicant shall be treated as non-responsive. NHM Raigad shall not be responsible for late receipt or non-receipt of application/ s for any technical reason or whatsoever. The applications received after due date and time shall not be considered.

Scanned with ACE Scanner

Scanned with OKEN Scanner

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..................................................................

श्री....................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,..........................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ............................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-

Scanned with ACE Scanner

Scanned with OKEN Scanner